सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई
जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० E-mail : mah-sforum@nic.inWebsite:- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./आस्था/सहा.अधि./पदोन्नती /२०२४/ ४२१२ दिनांक - १२ सप्टेंबर, २०२४

## -: कार्यालयीन आदेश :-

ग्राहक संरक्षण यंत्रणेतील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व अधिनस्त असलेल्या जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवरील सहायक अधिक्षक, गट-क , या संवर्गातील राज्यस्तरीय रिक्त पदे भरण्याकरीता राज्य निवडसमितीच्या दिनांक १२/०९/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये वरिष्ठ लिपिक/अभिलेखापाल/वरिष्ठ अभिलेखापाल, या संवर्गातील खालील कर्मचा-यांची पदोन्नतीकरीता शिफारस करण्यात आली आहे.

वरिष्ठ लिपिक/अभिलेखापाल/वरिष्ठ अभिलेखापाल, (गट क ) संवर्गातील खालील, विवरणपत्रात नमूद पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ संरचनेतील वेतन बँड एस-१३ [S-१३][३५४००-११२४००] ( ६ वा वेतन आयोगानुसार वेतन बँड रु.९३००- ३४८०० अधिक ग्रेड वेतन रु. ४२००/-) या वेतनश्रेणीतील सहायक अधिक्षक या पदावर त्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांची विवरणपत्रातील रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी मा.नागरी सेवा मंडळ, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्या दिनांक १२/०९/२०२४ च्या बैठकीत शिफारस केल्यानुसार पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र | कर्मचा-याचे नांव | सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचे नांव | पदोन्नतीने पदस्थापना दिलेले पद व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीम. आ. दि. आंबेकर | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रत्नागिरी. | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रत्नागिरी, रिक्त पदी |
| २ | श्रीम. अं. अ. पाटिल | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, पुणे. | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई रिक्त पदी |

वरील कर्मचा-यांना सहायक अधिक्षक या पदावरील तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनूमती याचिका क्र. २८३०६/१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

प्रबंधक,राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठ नागपूर/औरंगाबाद व प्रबंधक,सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, यांनी वरील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे व पदोन्नतीच्या पदावर रुजू करुन घेवून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर आदेश या कार्यालयाच्या www.grahak.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे, सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त कर्मचा-यांना कार्यमुक्त करणे अथवा हजर करुन घेण्याबाबत संकेत स्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(उमेश सु. चव्हाण)
प्र.प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, मुंबई.

प्रति,

संबंधित कर्मचारी,

प्रतिलिपी

१. प्रबंधक (विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई

२. प्रबंधक (विधी), राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठ, औरंगाबाद/ नागपूर.

३ सर्व प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,

४. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय मार्फत संबंधित जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रत्नागिरी, पुणे.

६. कार्यालयीन आदेश नस्ती/वैयक्तिक नस्ती (संबंधित कर्मचारी).